गुरुवार दि.६ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड


मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# ओबीसींवरील अत्याचारावेळी ओबीसी नेते कुठे असतात?–प्रकाश आंबेडकर

## ओबीसींवरील अत्याचारावेळी ओबीसी नेते कुठे असतात?



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

निवडणुकीच्या तोंडावर ओबीसी नेते मिरवताना दिसतात. पण प्रत्यक्षात ओबीसींवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्याची वेळ येते तेव्हा हेच ओबीसी नेते कुठे गायब होतात? असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला. जालना जिल्ह्यातील भोकरदनमध्ये एका धनगर समाजाच्या कैलास बोऱ्हाडे यांच्यावर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलत होते. या घटनेतील दोषींवर तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी आंबेडकर यांनी केली आहे. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, छगन भुजबळ, नवनाथ पडळकर, लक्ष्मण हाके, पंकजा मुंडे हे स्वतःला ओबीसींचे नेतृत्व करणारे म्हणवतात. मात्र, ओबीसी समाजावर अन्याय होत असताना हे कुठे असतात? जालना येथील या गंभीर घटनेकडे या नेत्यांनी अजूनही गांभीर्याने पाहिलेले नाही, ही बाब दुर्दैवी आहे. वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी त्या गावाला भेट दिली असून, पोलिसांकडे कारवाईची मागणी केली आहे. मात्र, केवळ एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ मागितली असून, लवकरात लवकर कठोर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे.या संदर्भात जालना जिल्ह्यातील ओबीसी संघटनांशी चर्चा झाली असून, त्यांनी ६ तारखेला मोर्चा आयोजित केला आहे. शासनाने तातडीने दोषींना अटक करावी, तसेच गावकऱ्यांनी ही अमानुष घटना उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे, तर त्या गावावर सामूहिक दंड बसवावा, अशी मागणी ड. आंबेडकर यांनी केली आहे. तसेच तुम्ही जे पेरता, तेच उगवते. धार्मिक द्वेष पसरवल्याने राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत आहे, अशी खंत ड. आंबेडकर यांनी या वेळी व्यक्त केली.बिहारमधील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती चळवळ सध्या बौद्ध समाजाच्या महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी संघर्ष करत आहे. या चळवळीला देशभरातील तसेच परदेशातील बौद्ध समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा या दोन्ही संघटनांनी या चळवळीला वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा यांनी पूर्ण पाठिंबा जाहीर केला असल्याचे वंचित बहुजन बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. ड. प्रकाश आंबेडकर यांनी या आंदोलनावर बारकाईने लक्ष ठेवले असून चळवळीच्या मागण्यांना न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. महाबोधी मंदिर मुक्ती ही केवळ धार्मिक बाब नसून, ती भारताच्या राजनैतिक, सांस्कृतिक आणि परराष्ट्र संबंधांशी संबंधित महत्त्वाची चळवळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार या प्रचंड चळवळीच्या मागण्यांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत आहे. बौद्ध धर्म हा भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी महत्त्वाचा आहे. भारताच्या बौद्धधर्मीय भागीदारीमुळे जपान, मंगोलिया, व्हिएतनाम, दक्षिण कोरिया, थायलंड, म्यानमार, श्रीलंका, नेपाळ आणि कंबोडिया यासारख्या देशांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले असल्याचेही ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.मोदी सरकारचे दुर्लक्ष हे केवळ भारतातील बौद्ध समाजाच्या भावनांचा अपमान नसून, भारताच्या राजनैतिक कूटनीति आणि परराष्ट्र संबंधांवरही घातक परिणाम करू शकते अशी शंका आंबेडकरांनी व्यक्त केली आहे. अधिक दु:खाची बाब म्हणजे देशातील विरोधी पक्षांनीही या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले आहे. असे म्हणत ड. आंबेडकरांनी आम्ही केंद्र सरकारला महाबोधी महाविहार मुक्ती चळवळीच्या मागण्यांना तातडीने मान्यता द्यावी आणि बौद्ध समाजाच्या भावनांचा सन्मान राखावा अशी विनंती केली आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा या चळवळीला अखेरपर्यंत पाठिंबा देत राहतील आणि बौद्ध समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करतील. असेही आंबेडकरांनी सांगितले.

## दाभड परिसरात अनोळखी महिलेचे प्रेत आढळले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**



तालुक्यातील दाभड शिवारातील बामणी ते भोकरफाटा कॅनॉल रस्त्यावर कालव्याच्या बाजुला झाडा–झुडपामध्ये एका वयस्कर अनोळखी महिलेचा कुजलेल्या अवस्थेत असलेला मृतदेह दि.४ मंगळवार रोजी दुपारी आढळून आला. महीलेच्या अंगावर फिकट गुलाबी रंगाचे स्वेटर, निळ्या रंगाचे लुगडे, निळसर,गुलाबी फुले असलेले चादर आढळुन आले.

## तहसील कार्यालयासमोर शहीद स्मारकासाठी माजी सैनिकांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

जय जवान माजी सैनिक संघटना महागांव यांनी जिल्हाधिकारी यांना परिविद्धीन आधिकारी लदिमा तिवारी यांना जय जवान माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र मारुती आखरे सचिव डॉ.संजय चंदू राठोड व सदस्य यांनी निवेदन दिले संपूर्ण महागांव तालुक्यात कुठेही शहीद स्मारक नाही . त्याकरिता महागाव तहसील कार्यालयाच्या समोर शहीद स्मारक लावण्यात यावे जेणेकरून नवयुवकांच्या मनामध्ये देशभक्ती देशप्रेम व देश सेवेची भावना जागृत व्हावी व देशप्रेम निर्माण व्हावी माजी सैनिकांना सुद्धा मानवंदना देण्याकरिता सोयीचे होईल तरी जिल्हाधिकारी यांना शहीद स्मारकाची उभारण्याची मानली केली आहे .तहसील कार्यालयासमोर शहीद स्मारक लवकरात लवकर उभारण्यात यावे अशी जय जवान माजी सैनिक संघटना महागाव तालुका अध्यक्ष सचिव व संपूर्ण माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी व परिवार यांनी मागणी केली आहे .






## ऑटो रिक्षा चालकाने केला महागडा फोन परत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

ऑटो रिक्षा चालक–मालक अमीर शेख यांना लातूर शिवाजी चौक येथे महागडा मोबाईल फोन भेटला होता.अमीर शेख यांनी तो मोबाईल जवळ आहे त्या परिस्थितीत स्वतः जवळ ठेवला आणि या मोबाईल कोणीतरी फोन करेल आणि आपण फोन असल्याची माहिती देता येईल याची वाट पाहू लागला. काही वेळाने फोन ची रिंग वाजली, अमीर शेख यांनी हा आलेला फोन स्वतः मालकाचाच असावा अश्या भावनेने फोन उचलला. समोरच्या माणसाने फोन उचलताच सांगितले हा फोन माझा आहे आणि माझे नाव ओमकार स्वामी आहे. अमीर शेख यांनी ओमकार स्वामी यांना रेणापूर नाका येथे येण्यास सांगितले आणि स्वतः ओमकार स्वामी यांची चौकशी केली. मोबाईल पासस्वार्ड, रंग , कव्हर , स्क्रीन डीपी, या सर्व बाबीची पूर्ण चौकशी खरी करून ओमकार स्वामी यांना फोन परत केला. मोबाईल मालक ओमकार स्वामी यांनी अमीर शेख यांचे कौतुक केले, व आभार मानले.



## 'लाडकी बहीण' योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मार्चमध्ये

# गत महिन्याचा हप्ता महिला दिनाच्या पूर्व संध्येला मिळणार–अदिती तटकरेंची माहिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लाडक्या बहिणींना फेब्रुवारी महिन्याचा हप्ता हा महिला दिनाच्या पूर्वसंध्येला देण्यात येणार, अशी माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. तर महिला प्रतिनिधीसाठी विशेष सत्र होणार असल्याची माहिती आहे.अदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेवर विरोधक आधीपासूनच टीका करत आले आहेत. आम्ही जवळपास अडीच कोटी महिलापर्यंत पोहचू शकलो आहोत, गेल्या महिन्यातदेखील २ कोटी ४० लक्ष महिलांना यांचा लाभ पोहचला आहे. फेब्रुवारी महिन्यातीलदेखील त्याच प्रमाणात लाभार्थी राहणार आहेत.

अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजना ही विरोधकांच्या डोळ्यात खूपत असल्याने त्यांनी ह्या योजनेला विरोध केला आहे. आता महिलांचा महायुतीला मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांना नैराश्य आले आहे. म्हणून ते खोट्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण महायुतीचे सरकार सक्षम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार ही योजना अशीच सुरू ठेवणार आहे.अदिती तटकरे म्हणाल्या की, फेब्रुवारी महिन्याचा जो हप्ता आहे तो आपण महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महिल्याच्या खात्यात जमा करणार आहोत. तर मार्च महिन्याचा हप्ता अधिवेशन झाल्यावर विभागाच्या वतीने निधीचे नियोजन करण्यात येईल तेव्हा देण्यात येईल.अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्याचा योग्य निर्णय हा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील. आम्ही योजनेचा निधी लाडक्या बहीणींच्या खात्यात कसा जाईल यासाठी प्रयत्न करणार आहोत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.अदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रायगडमध्ये असताना सांगितले की रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रीपदासंदर्भात योग्य निर्णय होईल. आता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे पालकत्व आहे. त्यामुळे रायगडचा विकास कुठेही खंडित होणार नाही.

## आंतरराष्ट्रीय कथाश्रुत देवकिनंदन ठाकूर यांना

# ४ फुटांची बासरी देत केले कंधारात स्वागत!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार मन्याड खोर्यातील प्रति पंढरपूर अर्थात धाकटे पंढरपूर येथील वंदनीय श्री सद्गुरू संत नामदेव महाराज मठ संस्थान उमरज येथील महंत एकनाथ नामदेव महाराज उमरजकर यांच्या सुनियोजात १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ,मठ संस्थानातील मंदिराचा कलाशारोहण या धार्मिक सोहळ्यात आपल्या ओजस्वी सुमधुर सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवतकथा सांगणारे आंतरराष्ट्रीय कथाकार वंदनीय देवकिनंदन ठाकूरजी यांच्या कथेने या धार्मिक कार्यक्रमांत ७ दिवस कथेतून हिन्दी भाषिक असून सुध्दा मराठी बोलण्याचा उत्तम प्रयत्न करुन कथा श्रवण करणाऱ्या लाखों सद् भक्तांच्या मनी गारुड घालत प्रथमच मराठीतले श्री विठ्ठलांची सुमधुर आवाज उत्कृष्ट गीताने उमरज मठ संस्थानच्या गोपालन,कोरोना काळातले अन्नछत्र,अनेक धार्मिक,देशाभिमानी वृत्ती सहित अनेक उपक्रम कार्यक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले.

परीसर अक्षरशः दुमदुमून टाकले.यांचे दर्शन घेण्यासाठी सुकन्या दृष्टी अन् अधिश्वरी सौ.संगीता यांचे समवेत भेट घेऊन भगवान श्री कृष्णाने गोकुळात अनेकांना भूरळ घातली.म्हणून कथाश्रृतश्री वंदनीय देवकिनंदन ठाकूरजी यांनी श्रीकृष्ण भक्तीने ओतप्रोत असून त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक यशोदेच्या नंदलालास मानुन,त्यांच्या सर्व श्रीकृष्ण लिला व महात्म अनेक शहर,महानगर राधे–राधे म्हणत कृष्ण भक्तांच्या मनी गारुड घातले.यांच्या रसाळ वाणीतून धाकटे पंढरपूर येथे श्रीमत् भागवत कथा श्रवण करतांना सद् भक्त भारावून जातांना तल्लीन होऊन आनंद व्यक्त करत आहेत.त्यांच्या अद्गितीय कौशल्यास शतशः नतमस्तक !म्हणून कंधार शहरातील हरहुन्नरी कलावंत दत्तात्रय एमेकर यांनी ऐतिहासिक कंधार शहराच्या अन् आपल्या परिवाराच्या वतीने ही ४ फुटी विशालकाय बासरी वंदनीय देवकिनंदन ठाकूरजी महाराजांना दिली. हस्तकलेतून निर्माण झालेली ४ फुट लांबीची भलीमोठी बासरी(पावा) त्यांच्या समर्थ करकमलात देवून आशीर्वाद घेतला.कारण देवकिनंदन म्हणजेच कृष्ण साक्षात कृष्ण भगवानाच्या हाती हस्तकलेतून निर्माण झालेली बासरी देतांना आनंद वाटला.

# उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करावीत-पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व गावांमध्ये पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.मंत्रालयात आयोजित धुळे जिल्ह्यातील तसेच शेवगाव पाथर्डी मतदारसंघातील गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या आढावा बैठकीत श्री.पाटील बोलत होते. यावेळी पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार मोनिका राजळे, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील शिंदखेडा तालुक्यातील (जि.धुळे) जल जीवन मिशन अतंर्गत सुरु असलेल्या कामांचा आढावा घेतला. ज्या ठिकाणी योजनांतर्गत कामांची पूर्तता विहीत कालमर्यादेत केली जात नाही, अशा विलंबाने काम करत असलेल्या संबंधित कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करुन नोटीस बजावण्यात यावी. कामे हस्तांतरित करुन गतीने पूर्ण करून घ्यावी, असे निर्देश श्री. पाटील यांनी दिले. धुळे जिल्ह्यातील दुष्काळी भाग असलेल्या शिंदखेडा गावात नवीन जलकुंभ उभारण्याचे काम तातडीने पूर्ण करावे जेणेकरुन उन्हाळ्यात त्या ठिकाणी ग्रामस्थांना पाणीपुरवठा सहजतेने उपलब्ध राहील, असेही श्री. पाटील यांनी सांगितले. पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी धुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिसरातील गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांतर्गत कामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण होणे गरजेचे असल्याचे तसेच त्यादृष्टीने संबंधित सर्व यंत्रणांनी तातडीने क्षेत्र पाहणी करुन वेळेत कामांची पूर्तता करण्याचे सूचित केले. यावेळी शेवगाव, पाथर्डी व परिसरातील गावात प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांतर्गत सुरु असलेल्या कामांचाही आढावा घेण्यात आला. ही सर्व कामे गतीने पूर्ण करावीत. योजना अंमलबजावणीतील अडचणी तत्परतेने दूर कराव्यात. त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थानिक आमदार, सरपंच तसेच शिक्षण समिती अध्यक्ष यांच्यासोबत बैठक घेऊन आढावा घ्यावा. गावातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात, पाण्याची टाकी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

उन्हाळा सुरु होण्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची टाकी बसवण्याची कामे तातडीने सुरू करावी. तसेच गावात विहित मुदतीत काम पूर्ण न केलेल्या कंत्राटदारांवर नियमानुसार दंड आकारण्यात यावा. सर्व गावात योजना अमंलबजावणीसाठी उपयुक्त जागा पाहणी करून त्याची माहिती संबंधितांनी आढावा बैठकीत सादर करावी, अशा सूचना श्री.पाटील यांनी दिल्या. बैठकीत शेवगाव, पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील भगवान गड व ४६ गावांतील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच अमरापूर- माळीबाभुळगाव, बोधेगाव, शहरटाकळी या गावातील पाणीपुरवठा योजनांच्या कामाबाबत आढावा घेण्यात आला. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत चाकण औद्योगिक वसाहत व १९ गावातील पाणीपुरवठा योजनाच्या कामांचाही यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.



# संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाणीच्या निषेधार्थ कडा शहर बंदला उस्फूर्त प्रतिसाद





लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या व सोशल मिडीयावर त्यांच्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ बुधवारी कडा शहर बंद ठेऊन निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले होते.मस्साजोग येथील दिवंगत सरपंच संतोषभैय्या देशमुख यांची अमानुषपणे मारहाण करुन तसेच मानहानी करुन अतिशय क्रूरपणे हत्या केली गेली.त्याचे फोटो समाज माध्यमावर ३ मार्च रोजी प्रसारित करण्यात आले. त्यामुळे सर्व समाजामध्ये संतापाची लाट उसळली असून या अपराधी नराधमांना लवकरात लवकर फाशी व्हावी व दिवंगत आत्म्यास शांती मिळावी याकरिता बुधवारी कडा शहर बंद ठेवण्यात आले.यामधे व्यापारी संघटनांनी सहभाग घेतला होता.कडा शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले होते.यावेळी मागण्यांचे निवेदन पो.कॉ.सय्यद मझहर यांना देण्यात आले.यावेळी माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे,उपसरपंच दीपक कर्डीले,संदीप खाकाळ,बाळासाहेब कर्डीले,संजय ढोबळे,दत्ता होळकर,दीपक सोनवणे,अनिल शिंदे,विष्णू कराळे,रोहिदास कर्डीले आदी नागरिक उपस्थित होते.

# नांदेड जिल्हातील भटक्या कुत्र्यां बरोबर पाळीव कुत्र्यांच्या घाणीचा बंदोबस्त करण्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**



नादेंड जिल्हातील प्रत्येक घरगुती कुत्रे पाळणाऱ्या व्यक्तीने कुत्रे बाहेर घेउन जाताना कुत्र्याचे तोंड व्यवस्थित बांधले पाहिजे तसेच कुत्र्याची घाण गोळा केली पाहिजे या बाबद आदेश दिले पाहिजे शिवाय कॉपरेशन ने सर्व भटकी कुत्री त्वरित पकडा असाही आदेश दिला पाहीजे याआदेशा मुळे सर्व नागरिकांना एक चांगला दिलासा मिळणार आहे तरी आपण आपल्या परीसरातील ग्राम पंचायत ,नगर परिषद, नगरपालिका,महानगरपालिका भागातील सर्व भटकी कुत्री आठ दिवसांच्या आत पकडुन लोकंना दिलासा दयावा कारण भटक्या कुत्र्यांमुळे सर्वत्रच दहशत पसरली आहे तसेच पाळीव कुत्र्ये लघवी, संडास करून परिसरात घाण निर्माण करीत असल्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होत असून यांचां बंदोबस्त करण्याची मागणी जाधव व्यंकटी गोविंद रा.शिरशी बु ता. कंधार जि.नांदेड व पेठवडज येथील पाडुरंग व्यंकटी कंधारे सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या कडे निवेदन देऊन भटक्या व पाळीव कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

## लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मदतीने

# मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळाली एक लाख रुपयाची आर्थिक मदत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

नांदेड दक्षिण विधानसभेचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांच्या मदतीने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तुप्पा येथील रशिदाबी अस्लमसाब शेख यांना अपघाती उपचारासाठी मदत पाहिजे असल्याचे त्यांनी लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांना कळविले.तेव्हा आमदार साहेबांनी तात्काळ सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आरोग्यदूत शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे मराठवाडा संपर्कप्रमुख गजानन गिरी यांच्यामार्फत मदत करून मुख्यमंत्री सहायता निधीतून १००००० (एक लाख) रुपयांची आर्थिक मदत करण्यात आल्यामुळे रुग्णावर तात्काळ उपचार करण्यात आले. दोन दिवसांपूर्वी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी स्वतः यशोसाई हॉस्पिटल येथे उपस्थित राहून मुख्यमंत्री सहायता निधीचे पत्र दिले व रुग्णाला भेटून तब्येतीची विचारपूस केली..

या पुण्यकार्यात आपला थोडासा हातभार लागला याचे आत्मिक समाधान आणि रशिदाबी अस्लमसाब शेख यांना निरोगी उदंड आयुष्यासाठी आमदार साहेबांनी शुभेच्छा दिल्या.त्यावेळी माझ्यासमवेत शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, डॉ.उमेश देशपांडे, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, सुदिन पाटील बागल व रुग्णाचे नातेवाईक,डॉक्टर उपस्थित होते.









शेतकरी केरबा संभाजी किर्कन रा.संगतिर्थ ता मुदखेड हे ऊसाचा ट्रक्टर घेऊन कुंटूर साखर कारखाना कुंटूर येथे जात असताना ,जवाहरनगर तुप्पा भायेगांव रोड जवळ ट्रक्टर पलटी होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांने केली आहे.(लोकनेता न्युज नेटवर्क उमरा)

**क्र.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार**
**सिंदखेड राजा**
**दि. २१/०१/२०२५**

## जाहिरनामा

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका सिंदखेड राजा यांना जाहिर केले जाते की, अर्जदार रमाबाई भगवान साटे रा.साळेगांव ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांनी नामे खशी शरद पवार यांचा जन्म दि.१३/११/२०१८ रोजी राहत्या घरी ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे जन्म झाला असून अर्जदारांनी स्वतः सदरहू कायदेशीर जन्म नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या कायदेशीर जन्म दिनांक दि.२१/०१/२०२५ रोजी कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदार नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सही**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार सिंदखेड राजा

## स्वातंत्र्यवीर सावरकर,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,व लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या

# सामाजिक चळवळीतील विचारसूत्रे या विषयावर निगडी येथे परिसंवादाचे रविवारी होणार आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**




मातंग साहित्य परिषद -पुणे ,स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ -निगडी,समरसता गतीविधी-पिंपरी-चिंचवड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी दि.९ मार्च २०२५ सायं. ६.३० वा कॅप्टन जी.एस.कदम सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ, -निगडी, पुणे येथे .स्वातंत्र्यवीर सावरकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक चळवळीतील विचारसूत्रेया विषयावर परिसंवादाचे आयोजन केले आहे.या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीशजी प्रभुणे हे असणार आहेत.तर या परिसंवादात केंद्रीय भटके विमुक्त आयोगचे माजी अध्यक्ष: पद्मश्री दादा इदाते,भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार प्रदीपदादा रावत आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू व सुप्रसिध्द वक्ते सात्यकी सावरकर हे मार्गदर्शन करणार आहेत.सामाजिक समरसतेचे मूल्य समाजात रुजवण्याकामी हा परिसंवाद अत्यंत महत्त्वाचा असणार आहे.अशी माहिती सावरकर मंडळाचे कार्याध्यक्ष रमेशजी बनगोंडे आणि समरसता गतीविधीचे संयोजक सोपान कुलकर्णी यांनी दिली आहे.तरी पिंपरी-चिंचवड, पुणे व लगतच्या सर्व अबालवृद्धांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन मातंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ धनंजय भिसे यांच्याद्वारे करण्यात आले आहे.हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे.

# लोकहिताचे व जनहिताचे कामे करणारा सर्वसामान्य माणसाचा जनसेवक ठरतोय-विजय वानखेडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सवना गावासह सेनगाव तालुक्यातील लोकहिताचे,जनहिताचे व सामाजिक कार्य करण्यासाठी नेहमी चळवळीत असणारे तसेच सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन नेहमी आंदोलन करणारे विजय वानखेडे हे मूळ सवना गावचे रहिवासी आहेत त्यांनी त्यांच्या गावासह सेनगाव तालुक्यातील राशन लाभधारक बांधवांसाठी त्यांच्या सहकार्यांसोबत त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले होते त्यांच्या आंदोलनामुळे सेनगाव तालुक्यातील बऱ्याच राशन लाभधारक बांधवांचा फायदा झाला होता व प्रशासनाने दखल सुद्धा घेतली होती.. तसेच मागील काही वर्षांपूर्वी पासून सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मौजे ब्राह्मणवाडा ते सवना रोड रस्ता करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी निवेदन देऊन रास्ता रोको सह तसेच वेळोवेळी आंदोलन सुद्धा केले होते आणि त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन आज रोजी ब्राह्मणवाडा ते सवना रोड रस्त्याचे काम सुरू झालेले आहे... एवढेच नाही तर गावातील जलसंपदा विभाग लघु पाटबंधारे विभाग अंतर्गत मौजे चोंडी ते सवना धरण आहे त्या धरणाची शेतकरी बांधवांच्या कॅनॉल ला पाणी सोडण्याची विहीर फुटलेली होती व ती विहिर फुटल्यामुळे पाणी हे वाया जात होते त्यासाठी त्यांनी अनेक वेळा पत्रव्यवहार करून लघु पाटबंधारे अभियंता वसमत येथे त्यांनी अनेक वेळा पत्रव्यवहार केला त्यामुळे मोजे चोंढी ते सवनातलावाच्या विहिरीची तसेच भींतीची व सांडव्याच्या लेव्हलिंग भींतीची कामे जलसंपदा लघु पाटबंधारे विभागमार्फत करण्यात आली होती.. गावाचा आरोग्याचा प्रश्न सुटाव व आरोग्य विभागामार्फत गावामध्ये चांगली नवीन इमारत प्राथमिक उप आरोग्य केंद्राची असाव या हेतूने त्यांनी पुढाकार घेऊन जिल्हा परिषद कार्यालय हिंगोली ते मंत्रालय मुंबई इथपर्यंत पाठपुरावा करून गावातील उपआरोग्य केंद्र इमारतीसाठी त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने दखल घेतल्यामुळे आरोग्य विभागाकडे इमारतीसाठी निधी आलेला आहे... तसेच त्यांनी गावातीलअनेक निराधार बांधवांच्या पगारी चालू करण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करून अनेक निराधार बांधवांच्या पगारीसुद्धा सुरू होण्यासाठी पाठपुरावा केला आहे. त्यांनी जिल्हा परिषद शाळेतील रिक्त असलेले शिक्षकाचे पद भरण्यासाठी व शाळेला शिक्षक मिळण्यासाठी आपल्या सहकार्यासोबतअनेक वेळा निवेदन तसेच पत्रव्यवहार करून अनेक आंदोलन सुद्धा केलेली आहेत आज रोजी शाळेमध्ये रिक्त असलेले सर्व पदे भरण्यात आलेले आहेत...तसेच गावातील ज्या शेतकरी बांधवांना पीएम किसान सन्मान निधीचा लाभ मिळत नाही त्यासाठी त्यांनी मागील वर्षी वेळोवेळी पाठपुरावा व निवेदन देऊन प्रशासनामार्फत गावामध्ये काम घेण्यासाठी पाठपुरावा केला होता व त्यामुळे सेनगाव तहसील कार्यालयामार्फत गावामध्ये कॅम्प घेण्यात आलेला होता व त्या कॅम्प मध्ये अनेक शेतकरी बांधवांना लाभ मिळून पीएम किसान सन्मान निधी योजनेचा लाभ सुरू झालेला आहे.. तसेच गावामध्ये शासकीयआरोग्य विभागामार्फत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यासाठी ते दरवर्षी निवेदन देऊन पाठपुरावा करतात व पुढाकार घेतात.. व आरोग्य विभागामार्फत शासकीय सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन सुद्धा करण्यात येते.. एवढेच नाही तर सवना येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत ही अतिशय जुनी असून वर्ग ओले होतात निजीर्ण झालेल्या आहेत त्यामुळे शाळेला नवीन इमारत मिळण्यासाठी त्यांनी वेळोवेळी पंचायत समिती कार्यालय, सेनगाव ते मंत्रालय मुंबई शिक्षण विभाग यांच्यापर्यंत पत्रव्यवहार करून निवेदन सुद्धा दिलेले आहेत तसेच शिक्षण विभागामार्फत नवीन इमारत लवकरच शाळेला देण्यात येईल असे लेखी पत्र सुद्धा त्यांना शिक्षण विभागाने दिले आहे.. गावातील ग्रामपंचायत कार्यालयाची इमारती जुनी असून गावाला नवीन ग्रामपंचायत इमारत मंजूर करून नवीन इमारत मिळण्यासाठी त्यांनी अनेक वेळा जिल्हा परिषद कार्यालय हिंगोली येथे निवेदन देऊन पत्र व्यवहार केलेला आहे त्यामुळे जिल्हा परिषद कार्यालय हिंगोली यांनी गावाला ग्रामपंचायत कार्यालयाची नवीन इमारत मंजूर करण्यासाठी मंत्रालय मुंबई येथे प्रस्ताव सुद्धा पाठवलेला आहे.. तसेच मागील वर्षी त्यांनी सवना गावासह सेनगाव तालुक्यातील ज्या गावांना कृषी संजीवनी योजना पोखरा चा लाभ मिळालेला नाही अशा गावांना समाविष्ट करून लाभ द्यावा तसेच सवना गाव हे पोखरा दोन मध्ये समाविष्ट करावे यासाठी त्यांनी हिंगोली कृषी विभाग ते मंत्रालय मुंबई इथपर्यंत निवेदन व पत्रव्यवहार केला होता व त्यामुळे आज रोजी सेनगाव तालुक्यातील अनेक गाव पोखरा मध्ये समाविष्ट झालेले आहेत.. तसेच सवणा गाव चा कार्यकाळ संपलेला आहे त्यामुळे पोखरा भाग दोन मध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय हिंगोली यांनी वरिष्ठ कार्यालय कृषी विभाग मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सुद्धा पाठवलेला आहे.. तसेच आत्ताच मागील आठवड्यात त्यांनी गावातील काही लोकहिताच्या मागणी संदर्भात आपले सहकारी संतोष नायक यांच्यासोबत लोकशाही व शांततेच्या मार्गाने धरण आंदोलन केले होते.. त्या आंदोलनाची दखल प्रशासनाने घेऊन अनेक लोक हिताचे सामाजिक कामे मार्गे लावण्याचे लेखी आश्वासन देऊनपत्र सुद्धा दिले.. व तसेच राशन विभागामार्फत ज्या शेतकरी बांधवांचा राशन बंद झालेले अशा केसरी राशन शेतकरी लाभधारक बांधवांच्या खात्यावर गावातील १३४ लाभार्थ्यासह सेनगाव तालुक्यातील अनेक केशरी शेतकरी लाभधारक बांधवांच्या खात्यावर शासन निर्णयाप्रमाणे रोख रक्कम सुद्धा जमा झालेली आहे व जमा करण्याची प्रोसेस सुद्धा सुरू आहे असे लेखी पत्र सुद्धा त्यांना प्रशासनामार्फत देण्यात आले आहे.. तसेच इतर सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेऊन वेळोवेळी निवेदन पत्रव्यवहार तसेच सामाजिक कामे सोडवण्यासाठी सदैव ते प्रयत्नशील असतात त्यामुळे त्यांची एक सर्वसामान्यांचा लोकसेवक जनसेवक व लोकहिताचा सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण झालेली आहे तसेच त्यांना गावांमध्ये गावातील ग्रामपंचायत कार्यालयामार्फत सर्व कृष्ट कामगिरीबद्दल सर्वृष्ट पुरस्कार सुद्धा देऊन गुण गौरव करण्यात येऊन सन्मानपत्र देऊन पुरस्कार देण्यात आलेला आहे.



## पिंपरी,चिंचवड पोलीस उपायुक्त, डॉ.शिवाजीराव पवार यांचा सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

पुणे जिल्ह्यातील बहुळ व चिंचोशी गावात दरोडा घातलेल्या दरोडेखोरांना पिंपरी चिंचवड झोन ३ चे पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजीराव पवार व त्यांचे सहकारी दरोडे खोरांना अटक करुन कौतुकास्पद अशी कामगिरी केल्या बद्दल त्यांचा गौरव व चऱ्होली बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खडकी बार असोशिएनचे मा. अध्यक्ष ड. सुनिल झपे चेअरमन सुरेशभाऊ तात्याबा तापकीर, शांताराम आप्पा बबनराव तापकीर, चंद्रकांत पंढरीनाथ तापकीर, भाजपाचे जेष्ठ नेते बाळासाहेब मोळक, शहाजी तापकीर, बाळासाहेब किसन तापकीर, ज्ञानेश्वर राणू तापकीर आदी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिघी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बापूसाहेब ढेरे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दल या संघटनेच्या पाठपुराव्याला यश

### आळंदी नगरपरिषद अर्थसंकल्पात तृतीयपंथी कल्याणासाठी ३% ची तरतूद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**



संघर्ष नायक लोकनेते मा.भगवानराव वैराट साहेब यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दल पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांनी आळंदी नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी मा.कैलास केंद्रे साहेब यांना तृतीयपंथी यांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी निवेदन दिले होते,त्या निवेदनाची तत्काळ दखल घेत मुख्याधिकारी साहेब यांनी अर्थसंकल्पात तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी ३ टक्क्यांची तरतूद केली त्याबद्दल आज संघटनेच्या वतीने आळंदी नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी मा.कैलास केंद्रे साहेब यांचा सत्कार करून परमपूज्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब यांची प्रतिमा भेट देऊन त्यांचे आभार मानले, सत्काराला उपस्थित पुणे जिल्हा अध्यक्षःसंतोष सोनवणे,भाजी मंडई शाखा अध्यक्षःनिलेश ढोकणे,आळंदी शहर अध्यक्षाःप्रज्ञा पाटील, आळंदी शहर उपाध्यक्षाःयोगिता घनमोठे,आळंदी शहर सचिवःस्वाती आहेर,उषा सातपुते,आरोही पवार हे सर्व उपस्थित होते.

# लोहा मतदारसंघातील लिंबोटी,अंतेश्वर पाठोपाठ निम्न मानार प्रकल्प बारूळ चेही पाणी बाहेर जिल्ह्याला

## माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी व मानार धरण बारूळ लाभ क्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनात घेतला सहभाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा मतदारसंघातील उर्ध्व मानार प्रकल्प लिंबोटी नंतर मानार प्रकल्प बारुळ धरणाचे पाणी ६०० कोटी रुपयांच्या ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून हैदराबाद येथील मेधा कंपनी द्वारे धरणातील पाण्याचा उपसा करून लातूर जिल्ह्यातील उदगीर व जळकोट तालुक्यातील १२९ गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी पळविल्या जात असल्यामुळे दि.५ मार्च २०२५ रोजी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी स्वतः व धरण लाभक्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनात घेतला सहभाग घेतला.यावेळी उपस्थित माजी आमदार रोहिदास चव्हाण, हभप मधुकर महाराज बारूळकर,कंधार पं.स.चे माजी सभापती माणिकराव चोपवाड, भिमराव पाटील शिंदे,प्रा.प्रभाकर व्यवहारे, गणपतराव गायकवाड, व्यंकटराव घोरपडे, विठ्ठल गवळी, पांडुरंग गायकवाड, नामदेव कांबळे,ऋ ओमकार शिंदे, गंगाधर प्रचंड,परमेश्वर घोरपडे, किशनराव गायकवाड,प्रशांत नवघरे, रसूल भाई, प्रल्हाद भंडारे यांसह अनेकांची उपस्थिती होती. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ राजेंच्या पुतळ्यास पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले.उपस्थित मान्यवर माजी आमदार रोहिदास चव्हाण, हभप मधुकर महाराज बारूळकर आदीसह उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत शासन प्रशासनावर अंकुश ठेवत संभाव्य शेतकरी, शेतमजूर, कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तत्पर असल्याचे सांगितले.यावेळी उपस्थित निवृत्ती व्यवहारे माजी सरपंच बोरी,मोहन पा.वडजे,प्रा.प्रभाकर व्यवहारे यांसह असंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती होती.कंधार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव व पोलीस स्टेशन उस्माननगरचे सपोनि चंद्रकांत पवार यांनी आंदोलन काळात कुठलाही अनूचित प्रकार घडू नये यासाठी तगडा बंदोबस्त ठेवला होता.आंदोलन कर्ते शेतकरी धरणातील पाण्यात उतरले.जय भवानी जय शिवाजी, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, धरण आमच्या हक्काचं .., धरणाखालील शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे.. मिळालाच पाहिजे,नहीं चलेगी नही चलेगी दादागिरी नही चलेगी अशा विविध घोषणा उपस्थित शेतकऱ्यांनी दिल्या.



"मानार पेक्षा मांजरा नदीचे क्षेत्र मोठे आहे तेथील पाणी इथे आणून टाका.अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी संगनमताने कमीशन खाण्यासाठी ही योजना आखलेली आहे.हा पैसा आमचा आहे लोकप्रतिनिधीचा किंवा अधिकारी यांचा नाही याची उधळपट्टी करण्याचा अधिकार कुणी दिला.संबंधित ग्रामपंचायत चा ठराव घेतला आहे का?

–हभप मधुकर महाराज बारूळकर

"हे धरण १९६४ ला झाले माळरानावरील शेतकऱ्यांना दुसरं उत्पन्नाचे साधन नाही.दुसरे उद्योग धंदे नाहीत.सर्व उपजिविका शेतीवर आहे.या धरणातील पुर्ण गाळ काढणे गरजेचे आहे.पाण्याची साठवण क्षमता वाढवा गाळ काढणे महत्त्वाचे आहे.मी लोकप्रतिनिधी होतो अशा चुका कधी केल्या नाही.अनेक ठिकाणच्या तलावातील गाळ काढले.यावरील धरणासाठी मी मनोहर जोशी यांच्याकडून केंद्रातून ३९३ कोटी रुपये आणून काम करून घेतले.माझ्या काळात एक थेंब ही बाहेर जाऊ दिला नाही.लातूर मध्ये बाळासाहेब पाटील यांच्या काळातील केलेले प्रत्येक गावागावात तलाव आहेत.तिथल्या तिथे पाणी दिले तर येथून न्यायची आवश्यकता भासणार नाही.तुमचा अट्टाहास या धरणासाठी च का? तुर्त काम बंद करा.पाण्याची क्षमता वाढल्यानंतर एखाद्या योजना चालू कराव्यात.तोपर्यंत काम बंद ठेवण्यात यावे.

–शिवसेना उबाठा जेष्ठ नेते
माजी आमदार रोहिदास चव्हाण

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी विजयकुमार चिंतावार तर सचिवपदी कमलाकर बरकमकर व कार्याध्यक्ष पदी सारंग मुंदडा यांची फेरनिवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर | रमाकांत जोशी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे,प्रदेश संपर्कप्रमुख वैभवजी स्वामी,प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे,प्रदेश उपाध्यक्ष अशोकजी देडे,अभय कुमार दांडगे,विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्या आदेशान्वये नांदेड जिल्हाकार्यकारिणीने भोकर तालुका शाखेच्या उज्वल कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी विजयकुमार चिंतावार, कार्याध्यक्षपदी सारंग मुंदडा व सचिव पदी कमलाकर बरकमकर यांची फेरनियुक्ती केली असल्याची घोषणा करून नियुक्तीपत्र भोकर येथे झालेल्या बैठकीत दिले.

दि.५ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अभयकुमार दांडगे यांच्या उपस्थितीत भोकर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयात सर्व तालुका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.या बैठकीत नुतन कार्यकारणीची फेर नीवड करण्यात आली असून तालुकाध्यक्षपदी विजयकुमार चिंतावार,कार्याध्यक्ष पदी सारंग मुंदडा तर सचिव पदी कमलाकर बरकमकर यांची एकमताने फेरनिवड निवड करण्यात आली.सदर निवडिचे पत्र महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत मुळे व जिल्हा उपाध्यक्ष बालाजीराव नार्लेवाड यांच्या हस्ते झालेल्या बैठकीत देण्यात आले.







महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा भोकरचे अध्यक्ष व त्यांच्या सर्व टिम ने तालुक्यात अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले असून पत्रकारिता क्षेत्रातील कार्यसंघटन व न्याय हक्कांसाठी सर्वांनी भरीव योगदान दिले आहे.

या निवडणूक प्रक्रियेत संघाच्या सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी विजयकुमार चिंतावार व कमलाकर बरकमकर यांनी आपल्या मनोगतातुन सर्व पत्रकार बांधवांचे आभार मानले आणि पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी अधिक सक्रीय राहण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यकारिणीच्या इतर पदांवर निवड झालेल्या सदस्यांची नावे खालील प्रमाणे:- उपाध्यक्ष:- राजेश चंद्रे,विठ्ठल सुर्लेकर,कोषाध्यक्ष:- रमाकांत जोशी, सल्लागार:- सुधांशू कांबळे, संघटक:- शुभम नर्तावार, सहसल्लागार:- संदेश कांबळे आदींची एकमताने फेर निवड करण्यात आली.या झालेल्या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शिवसेना (शिंदे गट)वसंतराव अवचार यांची भानखेडा सर्कल प्रमुख पदी निवड




लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

सापडगाव येथील रहिवासी असलेले वसंतराव अवचार यांची शिवसेना शिंदे गटाकडून दि ५ मार्च रोजी भानखेडा सर्कल प्रमुख पदी निवड करण्यात आली, कळमदुरीचे विधानसभेचे आमदार संतोष बांगर यांच्या कार्यावर विश्वास ठेवून शिवसेना सेनगाव तालुका अध्यक्ष अमोल खिल्लारी यांच्या हस्ते वसंतराव अवचार यांना नियुक्ती प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला,

## लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजींच्या उपस्थितीत अण्णाराव पाटील शिंदे यांचा वाढदिवस साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क


**नांदेड | बाजीराव पाटील गायकवाड**

व्हीपीके परिवारातील सदस्य स्नेही अण्णाराव पाटील शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.देऊन वाढदिवस साजरा करते वेळी व्हिपीके उद्योग समूहाचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी शिंदे साहेब यांच्या विषयी म्हणाले अतिशय विनम्र,सुसंस्कृत, मितभाषी, उच्चशिक्षित,असलेले अण्णाराव पाटील शिंदे एक अनुभव असलेलं सर्व जबाबदाऱ्या सांभाळून कर्तुत्व सिद्ध करत आपल्या अनुभवाचा फायदा व्हीपीके परिवारातील नवयुवक तरुणांना देत ऊर्जा निर्माण करणारे अण्णाराव पाटील शिंदे,यांचा सर्वसमावेशकता, अभ्यासु वृत्ती नम्रता आपल्या प्रेमळ स्वभावाने असंख्य युवकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे, सर्वसामान्यांना सढळ हाताने मदत करत प्रत्येक युवकांनाच्या हृदयात अढळस्थान निर्माण करणारे सर्वगुणसंपन्न अण्णाराव शिंदे पाटील यांना लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या . यावेळी व्हीपीके परिवारातील सदस्य उपस्थित होते.



## जोमेगांव ता लोहा येथील डोंगराला अज्ञात व्यक्तींने लावली आग वन्यजीव व वनस्पती आगीत भस्मसात

### वनविभागाचे जाणून बुजून दुर्लक्ष मुग गिळून बसले गप्प



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी | बालाजी शिंदे**

जोमेगाव ता लोहा येथील डोंगरावर अज्ञात व्यक्तीकडुन आग लावण्यात आली असून अशा प्रकारची आग दरवर्षीच लावली जात असुन हजारो वन्यजीव , वनस्पती आगीमुळे संकटात सापडली आहेत.वनविभाग मात्र जाणुन बुजुन दुर्लक्ष करीत आहे. सर्व डोंगर जळून खाक होत आहे.वन्यजीव वनस्पती आगीच्या चपाट्यात आली असून. विशेष म्हणजे आतापर्यंत वनविभागामार्फत कुठलीच दखल घेतली नाही.वनविभाग दरवर्षीच झाडे लावून लाखो रुपये पाण्यात घालून एक ही झाड जीवंत राहत नाही.आपले खिसे भरून घेण्यासाठी दरवर्षी अशा प्रकारच्या आगी लावून दुर्मिळ झालेले वन्यजीव व वनस्पती ची वनविभागाच्या नाकर्तेपणा मुळे वनस्पती व प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. दरवर्षी होणाऱ्या वृक्षलागवडीची चौकशी करून वनविभागाच्या दोषीं गुत्तेदार,अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.असी जोमेगांव येथील नागरिकांनी मागणी केली आहे.

## प्रेरकांना थकीत मानधन देऊन शासकीय सेवेत सामावून घेण्याची यज्ञकांत कोल्हेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | गौतम बनसोडे**

साक्षर भारत प्रेरकांचे मागील प्रलंबित थकित मानधन तात्काळ देऊन शासकीय सेवेत रुजू करून घेण्याच्या मागणीचे निवेदन प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यानी नुकतेच नवनिर्वाचित आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

राज्यासह मराठवाड्यातील अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या १४ हजारांवर प्रेरकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यांनी दि.१३/१२/२०२४ रोजी आ.आनंदराव बोंढारकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.सदरिल निवेदनात असेही नमूद केले आहे की,२०१२ ते २०१८



सदरील कालावधीत प्रेरकांनी साक्षर भारत कार्यक्रमाअंतर्गत निरक्षरांना साक्षर करणे,दर सहा महिन्यांनी परिक्षा घेणे, शासनाच्या विविध योजने संदर्भात जनजागृती करणे अशी विविध प्रकारची कामे केली.कोरोना काळात कोरोना योद्धाची भुमिका पार पाडली तरीही ३१ मार्च २०१८ पर्यंतचे सरासरी ५२ महिन्याचे मानधन प्रलंबित राहिले.तद्नंतरही प्रेरकांनी सामाजिक हित लक्षात घेता आपलं समाजपयोगी कार्य चालू ठेवले. सदर बाब लक्षात घेऊन प्रेरकांचे मागील प्रलंबित मानधन तात्काळ देऊन नवभारत साक्षर भारत अभियानात समावेश करून अंशकालीन कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा यांसह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.येत्या हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा मांडून न्याय मिळवून द्यावा. तत्पूर्वी अनेक वेळा जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय,प्रौढ प्रशिक्षण संचालक कार्यालय पुणे, नागपूर हिवाळी अधिवेशन, मुंबई मंत्रालय, संसद भवन दिल्ली येथे वारंवार अनेक आंदोलने केली सदर आंदोलनात शिवराज पाटील पवार, प्रभाकर व्यवहारे,शहाजी पाटील शिंदे,पीआर चिखलभोसीकर यासह अनेकांनी नेतृत्व करून मोर्चे काढली तरीही संबंधित राज्य व केंद्र सरकारला जाग आली नसल्याचे यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर माजी प्रदेशाध्यक्ष नांदेड जिल्हाध्यक्ष यांनी सांगितले.

# नायगाव पद्मशाली समाज संघटनेचा विणकाराच्या मागणीला पाठिंबा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | माधव बैलकवाड**

विशेष मागास प्रवर्गाच्या व विणकरांच्या विविध मागण्यांसाठी ५ मार्च २०२५ पासून पुणे येथील संचालक बहुजन कल्याण विभागाच्या कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलनास पाठींबा देत नायगाव तालुका पद्मशाली समाज बांधवांच्या वतीने नायगावच्या तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

सन १९९४ मध्ये इतर मागास प्रवर्गात समाविष्ट असलेल्या जातींपैकी पद्मशाली, कोष्टी, साळी, सकुळ साळी इ. जातीच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विशेष मागास प्रवर्गाची निर्मिती करण्यात आली व २ टक्के स्वतंत्र आरक्षण लागू करण्यात आले. तसेच १२ विविध सवलती जाहीर करण्यात आल्या. परंतु ३० वर्षानंतरही २ टक्के स्वतंत्र आरक्षण लागू करण्यात आले नाही व विविध सवलतीची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे एस.बी.सी. जातीची प्रगती होऊ शकली नाही. आपल्या न्याय हक्कांसाठी आमचा समाज सन २००० पासून दरवर्षी शांततामय मार्गाने उपोषणे व धरणे आंदोलने करून शासनासोबत चर्चा करीत आहोत. शासनातर्फे दरवेळी आम्हांस आश्वासने दिली. परंतु अजूनही २ टक्के स्वतंत्र आरक्षण मिळाले नाही. तरी खालील मागण्या मान्य कराव्या या निवेदनात नमूद करण्यात आले

मागण्या :-१) वैद्यकिय, अभियांत्रिकी व इतर उच्च शिक्षणात विशेष मागास प्रवर्गासाठी (एस.बी.सी.) २ टक्के स्वतंत्र आरक्षण २०२५ च्या सत्रापासून लागू करावे.

२) विणकरांचे आर्थिक विकास महामंडळावर संघटनेचे प्रतिनिधी यांची नेमणूक करून त्वरीत चालू करावे.३) विशेष मागास प्रवर्गासाठी राज्यात १० आश्रमशाळा सुरु कराव्यात.

४) विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के राजकीय आरक्षण लागू करावे.५) विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे.५) यंत्रमाग महामंडळावर तज्ञ विणकरांची नियुक्ती करावी.

६) विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राज्यशासनाच्या योजनांसाठी एस. बी. सी. व केंद्र शासनाच्या योजनासाठी ओ.बी.सी. प्रमाणपत्र द्यावे.

७) एस.बी.सी. कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती द्यावी.८) एस.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृहे सुरु करावेत.व आमच्या समाजाच्या विविध मागण्या शासनास कळवाव्यात अशा या विविध मागण्याचे निवेदन नायगावच्या तहसीलदार डॉ.धम्मप्रिया गायकवाड.यांना नायगाव तालुका पद्मशाली समाज संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी. नायगाव तालुक्यातील पद्मशाली समाज बांधव. बाबुराव रामदिनवार. शंकरराव गोंटलावार. माधवराव नर्तावार. व्यंकटराव चन्नावार. तुळशीराम बिरेवार. पद्मशाली समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण चन्नावार. कोषाध्यक्ष बालाजी वंगावार. सचिव निलेश बिरेवार.कैलास रामदिनवार. साईनाथ आलेवार. दिगंबर यलगंदवार. रामप्रसाद चन्नावार. मारोती कोम्पलवार. प्रकाश लखपत्रेवार. साईनाथ चन्नावार.सुनिल भुसेवार. लक्ष्मण चन्ना.धर्माजी चिलकावार. रामजी अनमुलवार. मोहन जोगेवार. गोपीनाथ आंबटवार. लक्ष्मण बुध्दलवार. प्रल्हाद वंगरवार.गोविंद संग्र पवार. तुकाराम चिलकेवार.आनंद गुरुपवार. शंकर तलकोकुलवार. रुखमाजी कोकुलवार .शिवाजी रामदिनेवार. हनमंत चिलकावार. राजेश दुसेवार. दत्तात्रय आंबटवार. किशन कोंपलवार. पंढरी संद पटनमवार. नागेश रामदिनवार. गोपाळ आलेवार. व्यंकट चिलकेवार. लक्ष्मीकांत दुसेवार. दत्तात्रय कोकुलवार. श्रीनिवास गोटलावार. रवी गंगुलवार. राहुल मादसवार. माधव आलसटवार. मारोती अलगटलेवार. गजानन गुरुवार. प्रमोद जलदेवार .गंगाराम गोणेवार. यादव कोकुलवार. बालाजी चलमेवार. चंद्रकांत आलेवार. अजयवंगरवार.दिगंबर गंजेवार ज्ञानेश्वर चन्नावार. गोविंद जोरगुलवार. नागेश गुडेवार. अंकुश जलदेवार .गणेश मामीडवार. दत्तात्रेय इगेवार. संजय ताटीपामल. गोविंद तलकोकुलवार. ओमकार दुसेवार. दिगांबर मामीडवार. मारोती गुरुपवार. माधव जल्देवार. गंगाधर मामीडवार. मारोती गोटलावार. विठ्ठल. जिंदमवार. किशन पट्टेवार. विठ्ठलराव गोंटलावार सुनील चन्नावार.हानमंतराव आंबटवार. पंढरीनाथ माडेवार.इत्यादीच्या स्वाक्ष-या आहेत.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904